<u>तात्काळ</u>.

जा. क्र. माध्य-अ[ १४ ]/नमाशा/मान्यता/पुवि/९२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १. यांचे कार्यालय
दिनांक :- १५ /१० /१९९२.

05 OCT 1992

प्रति,

सचिव,

........महात्मा फुले जागृती मंडळ.........
...[illegible]री,..जि:.पुणे.......

विषय : सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

---

संदर्भ :- मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे पत्र क्र. एसएसएन/१०९२/३१४५/माशि-२ दि. २९सप्टेंबर १९९२.

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९२ पासून विना अनुदान तत्वावर/ कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची, पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यांत येत आहे.

[१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन, निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [ उदा. विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधान कारक असणे आवश्यक आहे.

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळांत शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी] फी च्या परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत तसेच प्रवेश वेळी विदयार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यांत येवु नये.

..२.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्राहिबिशन ऑफ कॅपिटेशनफीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यांत येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यांत येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्ती करण्यांत येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यांत येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यायावत व परिपूर्ण ठेवण्यांत येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यांत येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९. ३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यांत येणार नाही.

इतर अटी :-

[१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखादया शाळेची मान्यता काढून सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखादया शाळेचा मान्यता काढून घेतली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यांत घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संबंधित संस्थेने कायमस्वरुपी ठेव म्हणून ५०,०००/- [रुपये पन्नास हजार फक्त] चलनाद्वारे शासकिय कोषागारांत भरणे आवश्यक आहे. [केवळ इंग्रजी माध्यम शाळांकरिता.]

[illegible] विरोधात असल्यास दिलेल्या परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.

| अ. नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १ | महात्मा फुले जागृती मंडळ, भोसरी . | भोसरी पुणे. | आठवी जून १९९२ | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आंत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतिलिपी :-

१. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहिकरिता अग्रेषित.
त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रांत नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयांस प्राप्त झाले असल्यांस त्या . विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयांस सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-या-कडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी करुन तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयांस पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. मा. उपसचिव , शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२.

३. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीसाठी सादर.